**प्रेसनोट दिनांकः-३०/०७/२०१९**
**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.**

**"लॅपटॉप, चांदीची भांडी व मोबाईल घरफोडी करुन चोरणा-या अट्टल चोरट्यांना दत्तवाडी पोलीसांनी केले अटक"**

दत्तवाडी पोलीस स्टेशनचेतपास पथक अधिकारी कुलदिप संकपाळ आपल्या पथकासह घरफोडी करुन वाहनचोरी व इतर चो-यांना प्रतिबंध करण्यासाठी पर्वती भागात सहकारी गृहरचना संस्थांच्या परिसरात गस्त करत असताना शिवदर्शन महालक्ष्मी मंदिर समोरील मोकळ्या स्टेजच्या भिंतींच्या आडोश्याला चार इसम त्यांना संशईत हालचाली करत असताना दिसले म्हणुन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी आपली नावे -

१) कृष्णा सुंदर मुलिया, वय २० वर्षे, रा. कुसाळकर चौक, गोखलेनगर,पुणे
२) सोमेश्वर भानुदासगायकवाड, वय २० वर्षे, रा. भामरे ऑफिस जवळ पर्वतीदर्शन, पुणे
३) साहिल दिलीप सांबरे वय २० वर्षे, रा.मनमाना म्हसोबा चौक, पर्वती पुणे
४) सुरज रविंद्रजाबरे वय २१ वर्षे,रा.साई मंदिरकॅनॉल रोड, जनता वसाहत,पुणे.

अशी सांगितली त्यांची अंगझडती घेतली असता कृष्णा मुलिया याच्याकडे सॅमसंग कंपनीचा जे-७ प्राईम मॉडेलचा मोबाईल मिळुन आला, त्या मोबाईल बाबत चौकशी केली असता,त्यांनी वरील त्याच्या साथीदारांसह दि.०६/०७/२०१९ रोजी पर्वती सेथील चाळ नं.७५ मधील एका घरात एक मुलगी झोपली असताना,तिच्या उशाला ठेवलेला मोबाईल घरफोडी करुन चोरला असल्याचे त्याने सांगितले. त्याबाबत पुर्वी दत्तवाडी पोलीस स्टेशन येथेतक्रारनोंद होती.

त्यांच्याकडे अधिक चौकशीकेली असता सोमेश्वर भानुदा सगायकवाड यांने सागितले कि, काही दिवसांपुर्वी त्याच्या वरील साथीदारांच्या मदतीने त्याने तुळशीबागवाले कॉलनी येथील सोसायटी मधील दोन फ्लॅट फोडुन चांदीच्या वाट्या,समई व चांदीचे स्मृतीचिन्ह अशा वस्तु घरफोडी करुन चोरुन नेल्या होत्या. त्याबाबत दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंद होती. त्याचोरलेल्या वस्तु त्याने काढुन दिल्या.

तसेच चिपळुण(रत्नागिरी) येथील कृष्णाई मेडीकल सती स्टॅप चिपळुण येथुन डेल कंपनीचा लॅपटॉप घरफोडी करुन चोरुन आणला आहे. तो सुध्दा पोलीस चौकशीत त्यांनी काढुन दिला आहे. अशा त-हेने वरील आरोपींनी १)पर्वतीदर्शन, पुणे २)तुळशीबागवाले कॉलनी, सहकारनगर,पुणे ३)कृष्णाई मेडीकल, साती स्टॉप, चिपळुण येथे घरफोडी चोरी केलेला मोबाईल हँडसेट, चांदीची भांडी व डेल कंपनीचा लॅपटॉप असा चोरलेला मुद्देमाल दत्तवाडी पोलीसांनी केलेल्या तपासात जप्त केला आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक,कुलदिप संकपाळ, पोलीस हवालदार,तानाजी निकम, राजु जाधव, पोलीस नाईक,सुधीर घोटकुले, महेश गाढवे, सागर सुतकर, सोमेश्वर यादव, विकास कदम, नवनाथ भोसले यांनी तपास कार्यात सहभाग घेतला.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.